Impact Factor (SJIF): 6.092 E-ISSN: 2583-1615

International Journal of Research in Academic World

Received: 05/December/2024 IJRAW: 2025; 4(1):192-194 Accepted: 19/January/2025

# महाविद्यालयीन विद्यार्थ्यांमधील युवा समस्या

*[1]डॉ. गणेश प्रेमचंद वायकोस

*[1]सहयोगी प्राध्यापक, मानसशास्त्र विभाग, बी. रघुनाथ कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय, परभणी, महाराष्ट्र, भारत।

**सारांश**

तारुण्यावस्था किंवा युवावस्थेच्या कालावधीत युवकांना अनेक समस्या आणि अडचणींना सामोरे जावे लागते. वैफल्य, चिंता, ताण, भावनिक बिघाड, विषमायोजित वर्तन अशा अनेक समस्या युवकांमध्ये या कालावधीत आढळतात असे संशोधकांना त्यांच्या अभ्यासात निष्कर्ष प्राप्त झाले आहेत. प्रस्तुत संशोधनाचा उद्देश विद्यार्थ्यांमधील युवा समस्यांमध्ये त्यांचे वास्तव्य, लिंग आणि शिक्षण शाखेनुसार फरक आढळतो का ते तपासणे असा होता. प्रस्तुत संशोधनासाठी परभणी शहरातील विविध महाविद्यालयात शिक्षण घेत असेलेल्या १८ ते २५ वयोगटातील १६० विद्यार्थ्यांची अंतिम निवड करुन खालील प्रमाणे त्यांचे वर्गीकरण करण्यात आले. महाविद्यालयीन विद्यार्थ्यांमधील युवा समस्यांचे मापन करण्यासाठी कु. संध्या शर्मा यांची युवा समस्या शोधिका (Youth Problem Inventory) (YPI) यांची चाचणी वापरण्यात आली. प्राप्त प्रदत्ताच्या विश्लेषणासाठी मध्यमान, प्रमाण विचलन आणि 'टी' चाचणी या सांख्यकीय पद्धतींचा वापर करण्यात आला. प्रस्तुत संशोधनात असे आढळून आले की, शहरी भागातील आणि ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांमध्ये युवा समस्यांच्या बाबतीत फरक आढळून आला. त्याचप्रमाणे मुले आणि मुलींमध्ये युवा समस्यांच्या बाबतीत फरक आढळून आला आणि कला आणि विज्ञान शाखेतील विद्यार्थ्यांमध्येदेखील युवा समस्यांच्या बाबतीत फरक आढळून आला.

**मुख्य शब्द:** युवा, युवा समस्या।

## प्रस्तावना

मानसशास्त्रज्ञ, समाजशास्त्रज्ञ आणि राजकीय वैज्ञानिक युवकांचे वर्तन हा अभ्यासाचा प्रमुख विषय मानतात. कारण देशाचे आधारस्तंभ हे युवक आहेत आणि देशाची प्रगती ही युवकांवर अवलंबून असते. भारत तर हा युवकांचा देश आहे. त्यामुळे भारतासारख्या विकसनशील देशासाठी तर युवा वर्तनचा अभ्यास देशाच्या प्रगतीसाठी महत्वाचा ठरतो. तारुण्यावस्था किंवा युवावस्थेचा कालावधी वय वर्ष १३ ते २५ वर्ष असा मानला जातो. या कालावधीत युवकांना अनेक समस्या आणि अडचणींना सामोरे जावे लागते. वैफल्य, चिंता, ताण, भावनिक बिघाड, विषमायोजित वर्तन अशा अनेक समस्या युवकांमध्ये या कालावधीत आढळतात असे संशोधकांना त्यांच्या अभ्यासात निष्कर्ष प्राप्त झाले आहेत. याच कालावधीतयुवकांमध्ये अनेक शारीरिक बदलही होतात. म्हणूनतारुण्यावस्था किंवा युवावस्था हा महत्वाचा कालावधी मानला जातो. मेहरा (१९७७) यांना आपल्या संशोधनात असे आढळलेकी युवकांना युवा समस्यांमुळे पदवी शिक्षणात अडचणी निर्माण होतात.

## युवा समस्या

- **वैयक्तिक समस्या:** न्युनत्वाची भावना, विवाह, लैंगिक समस्या, रोजगारविषयक समस्या, व्यवसायविषयक समस्या, आणि धार्मिक समस्या
- **कौटुंबिक समस्या:** पालकांचा भेदभाव, भावंड संबंध, पालकत्व शैलीमधील फरक, पालकांची टिका आणि पालकांच्या मान्यतांबाबतच्या समस्या
- **सामाजिक-भावनिक समस्या:** युवकांच्या सामाजिक आणि भावनिक समस्या
- **शैक्षणिक समस्या:** युवकांना शिक्षण घेत असतांना येणाऱ्या समस्या

## समस्या (Problem)

महाविद्यालयातील विद्यार्थ्यांच्या युवा समस्यांचा अभ्यास करणे.

## उद्दिष्टय (Objective)

- विद्यार्थ्यांमधील युवा समस्यांमध्ये त्यांचे वास्तव्य, लिंग आणि शिक्षण शाखेनुसार फरक आढळतो का ते तपासणे.

## गृहितक (Hypothesis)

- विद्यार्थ्यांमधील युवा समस्यांमध्ये त्यांचे वास्तव्य, लिंग आणि शिक्षण शाखेनुसार फरक आढळतो.

## संशोधांच्या मर्यादा (Limitations)

- प्रस्तुत संशोधनाची व्याप्ती ही परभणी जिल्ह्यातील वरिष्ठ

*Corresponding Author: डॉ. गणेश प्रेमचंद वायकोस

महाविद्यालयातील विद्यार्थ्यांपुरतीच मर्यादित आहे.

- प्रस्तुत संशोधनात युवा समस्या हाच फक्त परतंत्र परिवर्तक म्हणून वापरला आहे.
- युवा समस्यांवर इतरही घटकांचा परिणाम होत असतो त्या घटकांचा प्रस्तुत संशोधनात केला गेला नाही.

## संशोधन पध्दती (Research Methodology)

### नमुना (Sample)

प्रस्तुत संशोधनासाठी परभणी शहरातील विविध महाविद्यालयात शिक्षण घेत असेलेल्या १८ ते २५ वयोगटातील २५० विद्यार्थ्यांची निवड विस्कळीत पध्दतीने करण्यात आली. एकूण २५० विद्यार्थ्यांपैकी प्रस्तुत संशोधनासाठी १६० विद्यार्थ्यांची अंतिम निवड करुन खालील प्रमाणे त्यांचे वर्गीकरण करण्यात आले.

**तालिका 1**

| शिक्षण शाखा | वास्तव्य | | | | एकुण |
|---|---|---|---|---|---|
| | शहरी | | ग्रामीण | | |
| | पुरुष | स्त्री | पुरुष | स्त्री | |
| कला | २० | २० | २० | २० | ८० |
| विज्ञान | २० | २० | २० | २० | ८० |
| एकुण | ४० | ४० | ४० | ४० | १६० |

### संशोधन साधन (Research Tool)

महाविद्यालयीन विद्यार्थ्यांमधील युवा समस्यांचे मापन करण्यासाठी कु. संध्या शर्मा यांची युवा समस्या शोधिका (Youth Problem Inventory) (YPI) यांची चाचणी वापरण्यात आली. प्रस्तुत चाचणीचा विश्वसनियता गुणांक ०.८६ अर्धविच्छेद विश्वसनियता पध्दतीने तर ०.७८ एवढी चाचणी पुर्नःचाचणी विश्वसनियता पध्दतीने निर्धारित केलेली आहे तर यथार्थता गुणांक ०.६९ ते ०.९० (सहवर्ती पध्दती) आहे.

### सांख्यकीय विश्लेषण पध्दती (Statistical Analysis Methods)

प्रस्तुत संशोधनात प्रदत्ताच्या विश्लेषणासाठी मध्यमान, प्रमाण विचलन आणि 'टी' चाचणी या सांख्यकीय पद्धतींचा वापर करण्यात आला.

### प्रत्यक्ष कृती (Actual Procedure)

प्रस्तुत संशोधनात निवडलेल्या प्रयुक्तांवर कु. संध्या शर्मा यांची युवा समस्या शोधिका (Youth Problem Inventory) (YPI) यांची चाचणी प्रशासित करण्यात आली. चाचणी सोडविण्यासाठीच्या सूचना त्यांना समजल्याची खात्री झाल्यानंतरच त्यांच्याकडून चाचणी सोडवून घेण्यात आली. चाचणीच्या मार्गदर्शक पुस्तिकेनुसार चाचणी प्रशासित करण्यात आली. मिळालेल्या गुणांकाच्या आधारे सांख्यिकीय विश्लेषण करण्यात आले.


### सांख्यकीय विश्लेषण (Statistical Analysis)

विद्यार्थ्यांमधील युवा समस्यांमध्ये त्यांचे वास्तव्य, लिंग आणि शिक्षण शाखेनुसार फरक आढळतो.

**तालिका 2:** वास्तव्य

| प्रयुक्त गट | N | मध्यमान | प्रमाण विचलन | टी मुल्य |
|---|---|---|---|---|
| शहरी | 80 | 106.39 | 9.41 | 2.97** |
| ग्रामीण | 80 | 110.10 | 5.89 | |

(टी सार्थकता मूल्य ०.०५ पातळीवर१.९७ आणि ०.०१ पातळीवर २.६०)





**ग्राफ़ 1**

वरील तक्ता आणि आलेखावरून असे निदर्शनास येते की, शहरी भागातील विद्यार्थ्यांचे युवा समस्या शोधिके वरील प्राप्तकांचे मध्यमान १०६.३९ तर प्रमाण विचलन ९.४१ असे आढळले आहे. तर ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांचे युवा समस्या शोधिके वरील प्राप्तकांचे मध्यमान ११०.१ तर प्रमाण विचलन ५.८९ असे आढळले आहे. 'टि' मूल्य २.९७ हे ०.०१ या सार्थकता पातळीवर या दोन गटात लक्षणीय फरक आहे असे दर्शविते. यावरून हे सिद्ध होते की, ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांमध्ये शहरी भागातील विद्यार्थ्यांपेक्षा अधिक युवा समस्या आढळतात.

**तालिका 3:** लिंग

| प्रयुक्त गट | N | मध्यमान | प्रमाण विचलन | टी मुल्य |
|---|---|---|---|---|
| मुले | 80 | 104.84 | 8.97 | 5.85** |
| मुली | 80 | 111.65 | 5.16 | |

(टी सार्थकता मूल्य ०.०५ पातळीवर१.९७ आणि ०.०१ पातळीवर २.६०)





**ग्राफ़ 2**

वरील तक्ता आणि आलेखावरून असे निदर्शनास येते की, मुलांचे युवा समस्या शोधिके वरील प्राप्तकांचे मध्यमान १०४.८४ तर प्रमाण विचलन ८.९७ असे आढळले आहे. तर मुलींचे युवा समस्या शोधिके वरील प्राप्तकांचे मध्यमान १११.६५ तर प्रमाण विचलन ५.१६ असे आढळले आहे. 'टि' मूल्य ५.८५ हे ०.०१ या सार्थकता पातळीवर या दोन गटात लक्षणीय फरक आहे असे दर्शविते. यावरून हे सिद्ध होते की, मुलींमध्ये मुलांपेक्षा अधिक युवा समस्या आढळतात.

**तालिका 4:** शिक्षण शाखा

| प्रयुक्त गट | N | मध्यमान | प्रमाण विचलन | टी मुल्य |
|---|---|---|---|---|
| विज्ञान शाखा | 80 | 103.98 | 7.76 | 7.84** |
| कला शाखा | 80 | 112.51 | 5.80 | |

(टी सार्थकता मूल्य ०.०५ पातळीवर१.९७ आणि ०.०१ पातळीवर २.६०)




**ग्राफ़ 3**

वरील तक्ता आणि आलेखावरून असे निदर्शनास येते की, विज्ञान शाखेतील विद्यार्थ्यांचे युवा समस्या शोधिके वरील प्राप्तकांचे मध्यमान १०३.९८ तर प्रमाण विचलन ७.७६ असे आढळले आहे. तर कला शाखेतील विद्यार्थ्यांचे युवा समस्या शोधिके वरील प्राप्तकांचे मध्यमान ११२.५१ तर प्रमाण विचलन ५.८ असे आढळले आहे. 'टि' मूल्य ७.८४ हे ०.०१ या सार्थकता पातळीवर या दोन गटात लक्षणीय फरक आहे असे दर्शविते. यावरून हे सिद्ध होते की, कला शाखेतील विद्यार्थ्यांमध्ये विज्ञान शाखेतील विद्यार्थ्यांपेक्षा अधिक युवा समस्या आढळतात.

वरील सांख्यिकीय विश्लेषणावरुण प्रस्तुत संशोधनात मांडलेले गृहीतक सिद्ध होते.

## निष्कर्ष (Conclusions)

- शहरी भागातील आणि ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांमध्ये युवा समस्यांच्या बाबतीत फरक आढळून आला. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांमध्ये युवा समस्यां शहरी भागातील विद्यार्थ्यांच्या तुलनेने अधिक आढळल्या.
- मुले आणि मुलींमध्ये युवा समस्यांच्या बाबतीत फरक आढळून आला. मुलींमध्ये युवा समस्यां मुलांच्या तुलनेने अधिक आढळल्या.
- कला आणि विज्ञान शाखेतील विद्यार्थ्यांमध्ये युवा समस्यांच्या बाबतीत फरक आढळून आला. कला शाखेतील विद्यार्थ्यांमध्ये युवा समस्यां विज्ञान शाखेतील विद्यार्थ्यांच्या तुलनेने अधिक आढळल्या.

## शिफारसी आणि सूचना (Recommendations and Suggestions)

- युवा समस्यांचा विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक, सामाजिक आणि सांस्कृतिक वर्तनाशीदेखील परिणाम होतो. तेंव्हा युवा समस्या आणि विद्यार्थ्यांचे शैक्षणिक, सामाजिक आणि सांस्कृतिक निरवर्तन यांच्यातील सहसंबंधाचाही अभ्यास पुढील संशोधनात करण्यात यावा.
- युवा समस्या आणि विद्यार्थ्यांचीव्यक्तिमत्व गुणवैशिष्ट्ये यांच्यातील सहसंबंधाचाही अभ्यासपुढील संशोधनात करण्यात यावा.
- प्रत्येक महाविद्यलयात समुपदेशन कक्षअसावा व त्यात विद्यार्थ्यांना समुपदेशन सेवा देण्यात यावी.
- विद्यार्थ्यांच्या युवा समस्यांचे महाविद्यालयातील समुपदेशन कक्षद्वारे युवा समस्यांची तपासणी करुन त्यांना मानसिक स्वास्थ्याविषयी माहिती देण्यात यावी.
- पालकांनी आणि शिक्षकांनी विद्यार्थ्यांना या कालावधीत भावनिक पाठिंबा द्यावा.

## उपयोजन (Applications)

प्रस्तुत संशोधनाचा उपयोग हा पालकांना आणि शिक्षकांना विद्यार्थ्यांमधील युवा समस्याआणि त्यांचे निरवर्तन यांच्यात सहसबंध आहे हे समजून घेण्यासाठी आणि त्यावर उपाययोजना आखण्यासाठी होईल.

## संदर्भ सूची (References)


1. Singh D, Tayal A. Youth Problems-A Comparative Study. *The International Journal of Indian Psychology*. 2023;11(9):1590-1594.
2. Soundararajan M, Purushothaman A. A Study on Youth Problems among the College Students in Perambalur District. *International Journal of Applied Research*. 2018;4(7):307-309.
3. Varma S. *Youth Problem Inventory (YPI), Manual*. Agara: Agra Psychological Research Cell; 1979.